वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणाऱ्या आर्थिक परिणामाचा चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

(कालावधी २०१०-२०२२)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्यविद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

मिलिंद शिवाजी जोंधळे

(एम.ए.(अर्थशास्त्र) बी.एड.एम.फिल)

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ.एन.एन. मुंढे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

श्री. संत गाडगे महाराज महाविद्यालय लोहा.

शैक्षणिक वर्षे २०२२

वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणाऱ्या आर्थिक परिणामाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

प्रस्तावना :-

शहरीकरणामुळे आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक प्रगतीचे लक्षण असले तरी शहरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. लोकसंख्येचा ओघ खेड्याकडून शहराकडे येत असल्यामुळे खेडी अविकसित राहिली. ग्रामीण भागाचा विकास अपुर्ण स्वरुपाचा राहीला त्याच बरोबर नागरीकरण वाढल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या प्रमाणात घट झाली. त्यामुळे शेती विकासात अडसर निर्माण झाली आहे. शहरामध्ये वाढत चाललेली गर्दी वाहतुकीच्या समस्या, वाढती गुन्हेगारी तसेच संप, मोर्चे, मिरवणुका, इत्यादीमुळे पोलीस यंत्रणेवर अतिरिक्त ताण निर्माण होऊन अंतर्गत शांतता व सुव्यवस्था कोलमडली आहे. तसेच वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण लोकांना महागाईला सतत सामोरे जावे लागले. शहरामध्ये महागाईचा दर नेहमीच जास्त असतो त्यामुळे त्याचा ग्रामीण भागातील उपभोगावर परिणामा होतो.

ग्रामीण जीवनात बदल झाला आहे जसे वाहतुक व दळणवळणाच्या विवीध साधनामुळे शहर व गाव यातील अंतर कमी झाले आहे. त्यामुळे संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण भागातील जनसमुदायावर झालेला दिसुन येतो. ग्रामीण भागातील व्यक्तीच्या विचारात व्यापकता आली, नागरीकरणामुळे ग्रामीण भागातील व्यक्तीच्या सामाजिक, राजकीय, शासकीय, सांस्कृतीक व शैक्षणिक विचार प्रणालीत सुधारणा झाली आहे. तसेच शहरातील विविध सोयीसुविधा गावापर्यंत पोहचल्या आहेत. दुरदर्शन, संगणक, डिशॲन्टेना, मोबाईल, इंटरनेट इ. सारखे विविध आधुनिक तंत्रज्ञान गावापर्यंत पोहचले आहे.

शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील समाजात शैक्षणिक जागरुकता निर्माण झाली आहे. साक्षरतेच्या प्रमाणात झपाट्याने वाढ होत आहे. शहरात विविध शिक्षणाच्या आधुनिक पध्दती व सुविधा सहजपणे उपलब्ध होत आहत. थोडक्यात समाजात शैक्षणिक जागरुकता निर्माण करण्यात शहरी करण पोषक ठरत आहे. शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील व शहरातील माणसांच्या अंतर्गत व बाह्य व्यक्तिमहत्वाचा विकास होण्यास मदत झाली आहे. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजु लागला आहे. तसेच आधुनिक विचारसरणी व दृष्टीकोनामुळे समाजाची व परिणामी माणसाची भाषा, आचार, विचार पध्दती यामध्ये आमुलाग्र बद्दल झाले आहेत.

वाढत्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्यास मदत झाली आहे. यामुळे अनेक प्रकारच्या व्यापाऱ्यांना चालना मिळाली आहे, गृहनिर्माण विविध प्रकारच्या सुविधा पुरविणारे व्यवसाय, रस्ते निर्माण रस्ते दुरुस्ती त्याचबरोबर सार्वजनिक नोकऱ्या व उद्योगधंदे खाजगी कंपन्या अशा अनेक कारणामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मीती झाली आहे.

भारतात शहरीकरण वाढले आहे व वाढत जाणारे आहे. भारत एक विकसनशिल राष्ट्र असल्यामुळे भारतात शहरीकरणाला टाळता येत नाही देशाच्या दरडोई उत्पन्न वाढीमध्ये शहरीकरणाची भुमिका महत्वाची आहे. हे विकसीत देशाच्या झालेला विकासवरुन कळते. त्यामुळे भारतात वाढत जाणारे शहरीकरण संकट किंवा आव्हान नसुन विकासाची एक संधी आहे हाच व्यापक दृष्टिकोन सरकारने स्विकारुन शहरी विकासाचे धोरण आखले आहे. भारतीय शहरीकरणाने बकालता, अनारोग्य, प्रदुषण असे अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. यावर नागरी नियोजन करताना अनुकुल शहरीकरणाचे नियोजन कठोर बसवावे लागेल.

शहरीकरण ही विकासाची एक प्रक्रीया आहे असे मानल्यास अतिशयोक्ती होणार नाही. वाढत्या शहरीकरणामुळे केवळ शहराचाच लाभ होतो असे नाही. तसेच लाभा बरोबर शहरानां अनेक समस्यांना सुध्दा तोंड द्यावे लागते. परंतु या शहरीकरणाचा

प्रभाव शहरात आलेली व्यक्ती ज्या ठिकाणावरुन आली त्या भागाचा विकास करण्यात सुध्दा मदत करते. एकंदरीत ग्रामीण भागातील अल्प रोजगार, शिक्षण व आरोग्याच्या अपुऱ्या संधी या समस्याच्या सोडवणुकीसाठी होणारे शहरीकरण ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासातील एक मोलाचा दगड आहे.

शहरीकरणाचा परिणाम पर्यावरणावरही मोठ्या प्रमाणावर होत असतो. शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असते कितीही थांबवण्याचा प्रयत्न केला तरीही पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये अनाधिकृत बांधकाम होत असते. शहरातील जमिनीतील भुजलाची पातळी घटली आहे. शहरीकरणामुळे सामाजिक व्यवस्थेवर सुध्दा परिणाम होतो. आता शहरातुन एकत्र कुटुंब पध्दती जवळ जवळ नाहीश्या झाल्या आहेत. सर्वजण आत्मकेंद्रीत झाले आहेत. सामाजिक बांधीलकी कमी होत चालली आहे. आता वृध्दाश्रमाची गरज वाढत आहे.

शहरीकरणाची संकल्पना :

नागरीकरणाची संकल्पना अभ्यासताना शहरीकरणाचा अर्थ आर्थिक निकष तसेच शहरीकरणाची कारणे अभ्यासली आहेत. जेणेकरुन शहरीकरणाचा अर्थ सविस्तर स्पष्ट होऊ शकेल.

शहरीकरणाचा अर्थ :

शहरीकरण म्हणजे काय? या संदर्भात निश्चित व्याख्या नाही प्रकल्प, वस्त्या, औद्योगिक विकास केंद्रे रेल्वे वसाहती, महत्वाची पर्यटन केंद्रे यांचा समावेश शहरीकरणात होऊ शकेल.

1991 जनगणनेत शरीकरणाचा योग्य अर्थ सांगताना पुढील शहरीकरणाचे निकष सांगितलेली आहेत.

1) ज्या भागात महानगरपालीका, नगरपालीका किंवा नगरपरिषदेच्या रुपाने व्यवस्थापन पाहिले जाते त्या भागास शहरी भाग म्हणतात.

2) लोकसंख्या कमीत कमी 5000 किंवा त्यापेक्षा अधिक ज्या भागात आहे तो भाग शहरी भाग होय.

3) ज्या भागात किमान 75% काम करणारी लोकसंख्या बीगर कृषी व्यवसायास गुंतलेली आहेत तो भाग शहरी भाग होय.

4) ज्या भागात लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी किमान 400 व्यक्ती किंवा त्यापेक्षा जास्त आहे त्या भागाचा समावेश शहरी भागात होतो.

थोडक्यात ज्या भागात परंपरागत व्यवस्थेपेक्षा वेगळी व्यवस्था समाजरचना अर्थरचना विकसित होते व तिथे लोकसंख्येची गर्दी रोजगार संधी शोधण्यासाठी सुविधाचा उपभोग घेण्यासाठी आकर्षित होते तो भाग शहरी भाग होय अशी शहरीकरणाची संकल्पना मांडता येते.

आर्थिक विकासाचा स्तर हा शहरीकरणाच्या प्रवृत्तीशी संबधीत असतो तर काही शरीकरणाला आर्थिक विकासाचा पर्याय मानतात त्यांच्या मते आर्थिक विकासाची वास्तविक पारख ग्रामीण व शहरी क्षेत्रातुन होणाऱ्या लोकसंख्येच्या प्रवासाशी निगडीत आहे. विकसित देशामध्ये बहुतांश लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्यास असते.

शहरीकरणाचा अर्थ एखाद्या समाजात शहराची संख्या वाढणे किंवा रविवाशीद्वारे शहरी जीवन पध्दतीचा अंगीकार करण्याशी संबधीत आहे. काही अभ्यासकांनी शहरीकरणाच्या पुढील व्याख्या दिल्या आहेत.

1) **बर्गेल यांच्या मते**,

"ग्रामीण क्षेत्राद्वारे शहरी क्षेत्रामध्ये रुपांतरणाची प्रक्रिया म्हणजे शहरीकरण होय. या प्रक्रियेचा लोकसंख्येच्या आर्थिक संरचनेवर महत्वपुर्ण प्रभाव पडतो. ज्या प्रमाणात शहराची लोकसंख्या वाढते त्या प्रमाणात कृषीवर निर्भर लोकसंख्येत घट होत जाते."

2) **फेयर चाइल्ड यांच्या मते**,

"शहरीकरण ही एक शहर बनवण्याची प्रक्रिया आहे याचा अभिप्राय व्यक्ती किंवा सामाजिक क्रियांद्वारा शहरी क्षेत्रांच्या अनुरुप रुपांतरीत होण्याशी आहे. याचा प्रभाव शहरी क्षेत्राशी लोकसंख्या वाढण्यात होतो."

3) **सोवनी एन.वी. यांच्या मते**,

"एकुन लोकसंख्येमध्ये शहरी लोकसंख्येच्या अनुपाताला शहरीकरणाचे अपरिपक्व सुचक मानले जाते कारण यामुळे संपुर्ण देशातील शहरी लोकसंख्येचे वितरण समजण्यास मदत होते."

4) **नेल्सन ॲडरसन यांच्या मते**,

"ज्या ठिकाणी उद्योगशीलता अधिक प्रमाणात आढळते आणि संपुर्ण जीवनपध्दती नवीन तयार होते. त्यास नागरीकरण म्हटले जाते."

5) **क्लाइड मिचेल यांच्या मते**,

"ज्यावेळी मोठ्या संख्येने लोक खेड्याकडून शहराकडे येतात शेतीचा व्यवसाय सोडून यंत्रोत्पादनाचा स्विकार करतात. आपल्या सवयी बदलतात आणि तेथील अनुशंगाने आपली राहणी बदलण्यास सुरुवात करतात. त्यावेळी शहरीकरणाची प्रक्रिया सुरु होते."

संशोधनाचे महत्व:

प्रस्तुत प्रबंधात वाढते शहरीकरण हा एक घटक समाजाच्या दृष्टीने संशोधन महत्वाचे ठरणार आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये बहुतेक विभागामध्ये औद्योगिक, उद्योग, व्यवसाय, बँक, कृषी, शिक्षण, राजकीय समाज इ. क्षेत्राचा अभ्यास करण्यात आला आहे. परंतु नांदेड विभागातील ग्रामीण भागावर होणाऱ्या आर्थिक परिणामाचा अभ्यास हा झालेला नाही. वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागावर होणाऱ्या मार्मिक परिणामाचा विशेष अभ्यास नांदेड 2010 ते 2022 असा विषय घेवून यात नांदेड जिल्ह्यातील तालुका

निहाय आरोग्य शहरीकरणाचे प्रमाण ग्रामीण भागातील लोकांचे राहणीमान, दरडोई उत्पन्न शिक्षण, रोजगार, उद्योग व सेवाक्षेत्र इ. स्वरुपाचा एकंदरीत अभ्यास करण्यात आला आहे. हा पाहिलाच अभ्यास विषय असुन या उद्योग, ग्रामीण लोकांचे राहणीमान, शहरी नागरी प्रशासन, महाराष्ट्र शासन, विविध संशोधन करणाऱ्या संस्था अभ्यासक तसेच सरकार शासनात नागरी प्रशासनाचे धोरणे ध्येय ठरविण्यासाठी हा अभ्यास उपयोगी पडेल. ज्ञानाला नेहमीच प्रकाशाची उपमा दिली आहे. संशोधन साधारणत: सामाजिक कल्याणासाठी केले जाते. सामाजिक संशोधन करुन झालेल्या ज्ञानाचा उपयोग करुन सामाजिक आर्थिक प्रश्न सोडविले जाते. म्हणुन सामाजिक संशोधनाचे साहाय्य होणे आवश्यक आहे. सामाजिक प्रगती परिवर्तने समाज कल्याणा करीता असते सामाजिक नियंत्रण ठेवल्यास आति उपयुक्त ठरते. सामाजिक नियोजन करता येते.

समस्यासुत्रण:

प्रस्तुत शोध प्रबंधात वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागावर होणारे आर्थिक परिणाम (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) आर्थिक व सामाजिक, समस्यांचा वेध घेण्यात येणार आहे. शहरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत आंतरसंबध असतो काय? शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण अर्थव्यवस्था ही मागासलेली असल्याची कारणे कोणती? शहरी भागातल्या तुलनेत ग्रामीण भागात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर आढळते त्याची कारणे कोणती? शहराच्या तुलनेत ग्रामीण भागाचा विकास कमी होण्याची कारणे कोणती ? वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील अनुत्पादक लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे काय? शहरीकरणामुळे दारिद्रय निर्मुलनास मदत झाली आहे काय? ग्रामीण भागात वाढत चाललेली बेरोजगारी हे शहरीकरणाचे प्रमुख कारण आहे काय? ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक स्थितीचा जिल्ह्याचा अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडतो काय? वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागाच्या उत्पादनावर अनुकुल परिणाम झाला आहे का? वाढत्या शहरीकरणाच्या प्रवृतीमुळे ग्रामीण भागातील शेती व व्यवसाय करणाऱ्यांना कमी लेखले जाते काय?

संशोधनाची उदिष्ट्ये:

1) नांदेड जिल्ह्यातील शहरीकरणाचा ग्रामीण भागावरील परिणामाचा अभ्यास करणे.
2) नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी लोकांच्या जीवनमानाचा अभ्यास करणे.
3) नांदेड जिल्ह्यातील शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
4) शहरी अर्थव्यवस्था व ग्रामीण अर्थव्यवस्था यांचा संबध अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके,

1) शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील रोजगारात वाढ झाली आहे.
2) शहरीकरणामुळे जमीनीचे प्रमाण कमी होत आहे.
3) शहरीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढत आहे.
4) शहरीकरणामुळे स्थानिक बाजारपेठ विकसित होऊन शेतमालाला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होत आहे.
5) शहरीकरणामुळे ग्रामीण भागात सेवा क्षेत्राचा विकास होत आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामुग्रीच्या आधारे माहिती संकलित करण्यात येणार आहे. वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणारे परिणाम (विशेष संदर्भ-नांदेड जिल्हा) आर्थिक व सामाजिक परिणामाचा अभ्यास करण्यात येणार आहे. या विषयासाठी पुढील संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक सामग्री :

वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणाऱ्या परिणामाचा आर्थिक व सामाजिक यांचा अभ्यास या विषयासाठी प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण या पध्दतीचा वापर माहिती संकलित करण्यात येणार आहे.

दुय्यम सामग्री :

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती संदर्भग्रंथ मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र, शोधनिबंध/प्रबंध इंटरनेट विविध प्रकाशित व अप्रकाशित साहित्य इत्यादी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

नमुना निवड:

संशोधन करीत असताना संशोधक जरी संपुर्ण जिल्ह्याचे अध्ययन करत असला तरी सामग्रीचा अभ्यास करु शकत नाही त्यासाठी निवडलेल्या प्रतिनिधीक व्यक्तीकडून तो त्याचे संकलन करतो व निवडलेल्या प्रतिनिधीला नमुना असे म्हणतात नमुना निवड ही प्रामुख्याने दोन प्रकारात विभागली गेली आहे 1) संभाव्यता नमुना निवड 2) गैर संभाव्यता नमुना निवड (गैर संभाव्यता नमुनानिवडीचे चार उपप्रकार पडतात) अ) सोईस्कर नमुना निवड ब) स्वयंनिर्वाचित नमुना निवड क) सहेतुक नमुना निवड, ड) कोटा नमुना निवड संशोधनासाठी संशोधक सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

सहेतुक नमुना निवड :

सदर संशोधनासाठी साधा सहेतुक नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला आहे. जिल्ह्यात 16 तालुके आहेत परंतु एकुण नगर परिषदा 17 आहेत (17 वी कुंडलवाडी) म्हणुन एकुण शहरे 17 झाली म्हणुन प्रत्येक शहरामधुन 50 प्रश्नावली भरुन घेतली जाणार आहे. म्हणजे एकुण प्रश्नावली 850 भरुन घेतली जाणार आहे.

सांख्यिकीय तंत्र :

उपलब्ध माहितीचे विश्लेषन करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, माध्यमान, सहसंबंध आलेख इत्यादी सांख्यकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालखंड:

सदरील संशोधनासाठी 2010-2022 या कालखंडाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची व्याप्ती:

नांदेड जिल्ह्यातील बहुतेक अभ्यास हा वाढत्या शहरीकरणाचे ग्रामीण भागावर होणारे आर्थिक परिणाम याचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील जनतेलाही परीपुर्ण माहिती उपयोगी पडेल या दृष्टीकोणातुन या अभ्यासाची व्याप्ती आहे.

संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीवर आधारलेले आहे. विविध पध्दतीने जमा केलेली शासकीय आकडेवारी गोपनियता इत्यादीच्या अपुर्ण माहितीमुळे सामग्री संग्रहणावर मर्यादा पडतात. माहितीचा अपुरेपणा या संबधी मर्यादा आहेत. हा प्रबंध नांदेड जिल्हापुरता मर्यादीत आहे.

: **प्रकरण रचना** :

प्रकरण पहिले	प्रस्तावना व संशोधन पध्दती.
प्रकरण दुसरे	संदर्भ: साहित्याचा आढावा.
प्रकरण तिसरे	नांदेड जिल्ह्याची ओळख.
प्रकरण चौथे	सांख्यीकीय विश्लेषण
प्रकरण पाचवे	नांदेड जिल्ह्यातील वाढत्या शहरीकरणाचा ग्रामीण भागावर होणारा परिणाम.
प्रकरण सहावे	निष्कर्ष व शिफारशी.

:: संदर्भ ::

1. Emerging Issues of Urbonisation is India UGC Sponsered National Conference in Economics. पृष्ठ क्रं. 96.
2. J.K. Rautry population Growth Environment and Development. (1983) पृष्ठ क्र. 222-239.
3. Mitchell J.C. autoed in Genaled Brees Urbanization in Newly Developing Countries Printice Hall New Delhi. (1969) पृष्ठ क्रं. 2-3.
4. Nels Anderson and Iswarank Urbon Sociology New York Publishing House. (1964) पृष्ठ क्र. 1.
5. भारतीय अर्थशास्त्र एस.चाँद अँन्ड कंपनी, नवि दिल्ली.
6. लोकसत्ता दैनिक पेपर 6 जुलै 2016. पृष्ठ क्र. 3.
7. वा.भा. पाटिल - संशोधन पध्दती प्रशांत पब्लीकेशन, जळगांव
8. शर्मा रमेश चंद्र जनकिकी, राजीव प्रकाश मेरठ. (2005) पृष्ठ क्रं. 129.
9. शर्मा रमेश चंद्र जनकिकी, राजीव प्रकाश मेरठ. (2005) पृष्ठ क्रं. 129.
10. शर्मा रमेश चंद्र जनकिकी, राजीव प्रकाश मेरठ. (2005) पृष्ठ क्रं. 129.
11. शिरसाट शाम, बैनाडे भगवान सिंग पंचायतीराज आणि नागरी प्रशासन (विकास प्रक्रियेतील भुमीका) पिंपळगापुरे प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद (2014) पेज -237.
12. शिरसाट शाम, बैनाडे भगवान सिंग पंचायतीराज आणि नागरी प्रशासन (विकास प्रक्रियेतील भुमीका) पिंपळगापुरे प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद (2014) पेज -237.
13. शिरसाट शाम, बैनाडे भगवान सिंग पंचायतीराज आणि नागरी प्रशासन (विकास प्रक्रियेतील भुमीका) पिंपळगापुरे प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद. (2014) पेज -237.
14. शिरसाट शाम, बैनाडे भगवान सिंग पंचायतीराज आणि नागरी प्रशासन (विकास प्रक्रियेतील भुमीका) पिंपळगापुरे प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद. (2014) पृष्ठ क्रं. 238.

मार्गदर्शक
प्रो. डॉ. एन.एन. मुंढे
श्री. संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा

संशोधक
मिलींद शिवाजी जोंधळे
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड